महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ 24 एप्रिल 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 295 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# डोंबिवलीतील मृत पर्यटकांवर अंत्यसंस्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मंगळवारी मरण पावलेल्या, एकत्रित परिवारातील सदस्य या नात्याने वावरलेल्या समवयस्क संजय लेले, हेमंत जोशी आणि अतुल मोने या तिन्ही मावस भावांची बुधवारी रात्री डोंबिवली पश्चिमेतील भागशाळा मैदान येथून फुलांनी सजविलेल्या ट्रकमधून अंत्ययात्रा काढण्यात आली. मैदानातील मंचकावरून पार्थिव सजविलेल्या ट्रकमध्ये नेत असताना तिन्ही मृतांच्या कुटुंबीयांनी फोडलेल्या हंबरड्याने सर्वच उपस्थित गहिवरून गेले. दत्तनगर येथील शिवमंदिर स्मशानभूमीत मृतांच्या वारसांनी पार्थिवाला अग्नी देताच अनेकांना अश्रू अनावर झाले. संजय लेले यांच्या पत्नी कविता यांचे हेमंत जोशी आणि अतुल मोने हे मावस आणि आत्ये भाऊ होते. समवयस्क असलेले संजय, हेमंत आणि अतुल हे डोंबिवली पश्चिमेत विविध भागातील गृहसंकुलात राहत असले तरी ते एकत्रित कुटुंबाचे सदस्य नात्याने वावरत होते.

कौटुंबिक कार्यक्रम, पर्यटन, तिर्थाटन अशावेळी ही तिन्ही कुटुंब एकत्र येत असत. या विचारातून ते जम्मु काश्मीरमधील पहलगाम येथे मुलांच्या परीक्षा आटोपल्याने पर्यटनासाठी गेले होते. पहलगाम जवळील बैसरन टेकड्यांवर पर्यटनासाठी गेले असताना मंगळवारी दुपारी त्यांच्यावर पोलीस वेशातील दहशतवाद्यांनी क्रूरपणे हल्ला केला. या हल्ल्यात संजय, हेमंत, अतुल जागीच मरण पावले. संजय यांचा मुलगा हर्षलच्या हाताच्या बोटाला गोळी चाटून गेल्याने तो जखमी झाला. कुटुंबीयांच्या समोर दहशतवाद्यांनी या तिघांना ठार केल्याने कुटुंबीय हादरून गेले आहेत. नागरिकांच्या अंत्यदर्शनानंतर फुलांनी सजविलेल्या तीन ट्रकमध्ये तिन्ही पार्थिव ठेवण्यात आले. अंत्ययात्रेला प्रारंभ होताच कुटुंबीयांनी मन हेलावून टाकणारा आक्रोश केला. जय राम श्री रामचा गजर करत, व्यर्थ न हो बलिदान, दहशतवाद्यांचा निषेध करत अंत्ययात्रेला सुरुवात झाली. महात्मा गांधी रस्ता, कोपर पूलमार्गे अंत्ययात्रा शिवमंदिर स्मशानभूमी येथे नेण्यात आली. शोकाकुल वातावरणात संजय लेले, हेमंत जोशी, अतुल मोने यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात साश्रू नयनांनी अंत्यसंस्कार करण्यात आले. ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, कल्याण डोंबिवली पालिका आयुक्त अभिनव गोयल, अपर पोलीस आयुक्त संजय जाधव, पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी पार्थिवांचे दर्शन घेतले. भागशाळा मैदानातील नियोजनाची जबाबदारी माजी नगरसेवक राहुल दामले, समीर चिटणीस, विवेक खामकर, शैलेश धात्रक, संदीप पुराणिक, साहाय्यक आयुक्त राजेश सावंत, साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी पार पाडली.




## मुख्यमंत्र्यांकडून अंत्यदर्शन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डोंबिवलीत भागशाळा मैदान येथे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे, माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांच्या उपस्थितीत पार्थिवांचे अंत्यदर्शन घेतले. मृत कुटुंबीयांच्या नातेवाईकांचे त्यांनी सांत्वन केले. दहशतवाद्यांवर कठोर कारवाईची मागणी नातेवाईकांनी केली. याप्रकरणी कठोर कारवाईचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत संतप्त नागरिकांनी पाकिस्तान निषेधाच्या घोषणा दिल्या.



स्व. हेमंत जोशी स्व. संजय लेले स्व. अतुल मोने

## जम्मू काश्मीर हल्ल्याच्या निषेधार्थ आज डोंबिवलीत सर्वपक्षीय बंदची हाक

## थोडक्यात महत्वाचे

### डोंबिवली नागरी बँकेकडून पहलगाम हल्ल्याचा निषेध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांवर केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ आणि या हल्ल्यात डोंबिवलीतील तीन पर्यटकांचा मृत्यू झाल्याने या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी बुधवारी दुपारी डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या कर्मचारी, अधिकाऱ्यांनी बँकेचे मुख्यालय ते सर्व शाखांसमोर कर्मचाऱ्यांनी दहशतवादी हल्ल्याचे निषेध फलक घेऊन हल्ल्याचा निषेध केला. डोंबिवली नागरी सहकारी बँकेच व्यवस्थापकीय संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाव्यवस्थापक ते अधिकारी, कर्मचारी, सेवक वर्ग या निषेध आंदोलनात सहभागी झाला होता. बँक ग्राहक सेवेला या निषेध कार्यक्रमाची झळ पोहचणार नाही म्हणून भोजनाच्या दुपारच्या वेळेत भर रखरखीत उन्हात हा निषेध कार्यक्रम घेण्यात आला.

### पारसिक रेतीबंदर खाडीत अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - कळवा येथील पारसिक रेतीबंदर खाडीत बुधवारी एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेहआढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची नोंद कळवा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिसांनी हा मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठविला आहे. मृताची ओळख अद्याप पटली नसल्याची माहिती कळवा पोलिसांनी दिली. कळवा येथील गणपती विसर्जन घाट जवळ असलेल्या पारसिक-रेतीबंदर खाडीमध्ये एका अज्ञात पुरुषाच्या (४०) मृतदेह खाडीच्या किनाऱ्या जवळ आढळला. याची माहिती स्थानिकांनी कळवा पोलिस ठाण्याला दिली. माहिती मिळताच, कळवा पोलीस पथक, ठाणे अग्निशमन दलाचे जवान आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

### ठाणे जिल्हा परिषदेचे निवृत्त शिक्षक ग्रॅच्युटी रकमेपासून वंचित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

एप्रिल संपत आला ठाणे जिल्हा परिषद शिक्षकांचे ही पगार नाहीत.ठाणे प्रत्येक महिन्याचे वेतन दहा तारखे पूर्वी करणारच असे आश्वासन देणाऱ्या ठाणे जिल्हा परिषदेचे मार्च महिन्याचे वेतन एप्रिल संम्पत आला तरी देखील झाले नाहीत. ठाणे जिल्हा परिषदेत प्रशासकीय राजवट सुरु आहे. नको त्या कमांच्या नावाने उधळ पट्टी सुरु आहे. मात्र पगार देण्यास निधी नाही म्हणून शिक्षकांचे पगार रखडून ठेवले आहेत. ग्रॅच्युटी, पेन्शन च्या रकमा दोन वर्ष उलटून दिल्या गेल्या नाहीत, प्राथमिक शिक्षण अधिकारी सांगतात पैसे नाहीत. तर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणतात कोणाचे पैसे बाकी नाहीत. विभाग आढाव्या माहिती घेत असतो असे सी ओ साहेब म्हणतात. मग निवृत्त शिक्षकांची हेळसांड का.? असा प्रश्न या निवृत्त शिक्षकांचा आहे. ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागाला आर्थिक निधी का मिळत नाही? प्रशासन कमी पडते आहे? बिचारे सेवा निवृत्त व कार्यरत शिक्षक त्यामुळे हवालदिल झाले आहेत.

# जिल्हा परिषद मुख्याधिकाऱ्यांकडून मुरबाड तालुक्यातील विकासकामांचा आढावा

## मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या उपस्थितीत पंचायत समितीत विशेष बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जिल्हा परिषद ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती मुरबाड येथे बैठकदि. २३(जिल्हा परिषद, ठाणे) – ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या उपस्थितीत मुरबाड पंचायत समिती येथे दि. २२ एप्रिल, २०२५ रोजी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीमध्ये विविध विकासकामांचा आढावा घेण्यात आला आणि संबंधित अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या. या बैठकीत घुगे यांनी स्पष्टपणे सांगितले की, प्रशासकीय कामकाज बाबत कर्मचारी यांनी कार्यवीवरण पत्र, कामकाज संदर्भात सुरू असलेल्या फाईल, ई ऑफिस कार्यप्रणाली सुरळीतपणे पार पाडणे अत्यावश्यक आहे आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्यावर लक्ष केंद्रित करावे. कार्यालयीन सूचनांचे पूर्ण पालन करणे, योजनांची अंमलबजावणी तातडीने करणे आणि १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणे यावर त्यांनी भर दिला. तसेच १०० दिवसीय आराखड्यातील सर्व कामे ३ दिवसांत पूर्ण करण्यात यावेत. पी.एम.जन. मन व रमाई योजनेची घरकुलांना ७ दिवसांच्या आत मंजुरी देण्यात यावी. अभिलेख वर्गीकरणाचे नाशनाचे काम २ दिवसांत पूर्ण करण्यात यावेत. स्वच्छ भारत मिशन योजनेचे फोटो ३ दिवसांत अपलोड करण्याच्या सुचना दिल्या. त्यांनी दिलेल्या सूचनांमध्ये तालुक्याच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे काम करावे, आवश्यक तेथे जबाबदाऱ्या स्पष्ट करून कार्यवाही करावी, असे स्पष्टपणे नमूद केले.

बैठकीला उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) अविनाश फडतरे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) प्रमोद काळे तसेच गट विकास अधिकारी (मुरबाड) लता गायकवाड, सर्व तालुका विभाग प्रमुख, पंचायत समिती मुरबाड तालुक्यातील अधिकारी- कर्मचारी आदी उपस्थित होते.




# मुरबाड-शहापुरात उबाठा हतबळ ?

## अनेक महिला पदाधिकारी शिवसेनेला जय महाराष्ट्र करणार !!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** - शहापुर पदाधिरीच्या टोळ्या झाल्याने अंतर्गत कलहातुन शिंदे शिवसैनेत मेघाभर्ती सुरु,,,, राजकीय पक्ष असो, संस्था असो, कंपनी असो किंवा घर असो जर नियोजन नसेल आणि प्रमुख व्यक्तीची त्यावर पक्कड नसेल तर बेधुंदशाही निर्माण होते. याच बेधुंदशाहीमुळे अनेक कंपन्या, अनेक संस्था, अनेक कुटंबे आणि अनेक राजकीय पक्ष रसातळाला गेलेत. उद्धव ठाकरे यांची शिवसेना सध्या याच स्थितीतून मार्गक्रमण करीत आहे.

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे प्रमुख असलेले उद्धव ठाकरे सोबत बाळासाहेबांचे निष्ठावंत शिवसैनिकांची एकापिढीने पन्नाशी पार केली आहे, या दोन तालुक्यात बाळासाहेबांचे निष्ठावंत शिवसैनिक शिवसेनेसाठी नेतृत्व करणारे असले तरी ते अर्थिक कंचबनेला सामोर जात असल्याचे पाहता तरूणाईला आपल्या कडे वळविणे शक्य दिसत नाही , ज्या कडे संघटनेची जबाबदारी सोपविण्यात येते त्या कडे कोणतेच नियोजन नसल्याने व ज्याला शिवसैना काय हे कधीच कळले नाही व कळणार नाही अशाच्या हातात नेतृत्व दिल्याने शिवसेना पक्षाला फुटीचं ग्रहण लागले आहे, नेमलेले असे सुभेदार ईथेच थांबले नाहीत तर शिवसेना ही आमचीच आहे असे वर्तन पाहता तालुक्यातील पदाधिकाऱ्यांचे साधे फोन घेतले जात नाहीत की कधी त्यांना विश्वासात घेतले जात नाही,अशाना एकप्रकारे पक्षच त्याब्यात घेतला की काय?अशी वागणूक निष्टावंताना दिली जात असल्याल्या मुळे घायाळ झालेले निष्ठावंतांना गप्प राहणे किंवा शिवसेनाविचारांचा वसा जोपासणाऱ्या शिंदे गटाचा मार्ग निवडल्या शिवाय पर्याय राहिला नाही. उबाठात नेमलेल्या पाहुण्याला थेट ओटिवर बसविले असले किंवा सोबत असलेल्या कातडी बचाव सुभेदारांच्या ताकतीवर किंवा जोरावर येथील ढासळत असलेला बुरज रोखता येणार का! असा प्रश्न शिवसैनिकांसमोर निर्माण झालेला आहे. जिल्हा पदाधिकार महिला, उपजिल्हा संघटक, तालुकाध्यक्ष, सह अनेक महिलावर्ग लवकरच नेते प्रकाश पाटलांच्या उपस्थितीत शिंदेच्या शिवसैनेत प्रवेश करणार असल्याचे खात्री लायक वृत्त असून या वृत्ताला नेते प्रकाश पाटलांनी देखील दुजोरा मिळून येतोय, किंबहुना अशाच पद्धतीने शिवसेनेचा करभार सुरु राहिला तर, येथील शिवसेनेचं काही खरं नाही, कातडीबचाव आणि कोणतेही नियोजन नसलेल्या स्वार्थी सुभेदारांची फौज उभी केल्या मुळे जेव्हा लढण्याची किंवा लढा देण्याची वेळ आली तेव्हा हे सुभेदार घरात शांतपणे लपून बसतात यामुळे लढवय्या शिवसैनिकही शांत झाला. ज्यांनी मातोश्री च्या आशिर्वादामुळे मिळकत जमवली त्यांनी लढावे अशा भूमिकेत शिवसैनिक सध्या वावरताना दिसत आहे. त्यामुळेच येथील ढासळणाऱ्या बुरुजाला सावरणे तसे कठीण आहे. ठाणे करांसह शिवसेनारूपी वटवृक्षाच्या फांदया कापल्या गेल्याच्या त्या पाठोपाठ सर्वसामान्य माणसा पासून ते शिवसैनिकांपर्यत ज्याची नाळ जोडली गेली असलेल्या ठाणेचा अभेदबालेकिल्ला एकनाथ शिंदे यांनी ठाण्यासह ग्रामिण भागातील शिवसेना ताब्यात घेतली हे त्याचेच धोतक आहे. शिवसेना ताब्यात घेतल्यावर एकनाथ शिंदे भारावून गेल्याचे दिसत नाहीत. किंबहुना स्वतःला पक्ष प्रमुख म्हणूनही घेतले जात नाही. जमिनीवर पाय ठेऊनच पक्षाचा कारभार ते हाकताना दिसत आहेत. म्हणूनच सर्वांना सोबत घेऊन शिंदे चालत आहेत, सोबत शिवसेना जिल्हाप्रमुख ते उपनेते पदाची धुरा साभाळीत अनेक वेळा खासदार की सारख्या पदावर पाणी सोडवे लागलेले जनदूत प्रकाश पाटिलां सारखे सहकारी त्यांना लाभले आहेत, ज्यावर शिवसेनेकडून वारवार अन्याय झाला असल्याने ते निष्ठावंत म्हणून शिंदे सोबत आहेत, गेल्या सहा महिण्या पासून या दोन तालुक्यातील शेकडो शिवसैनिकांना उबाठा ला जयमहाराष्ठ करून शिंदेच्या शिवसेनेत प्रवेशाची जणू मालिकाच सुरू आहे रोजच पाटलांच्या हस्ते उबाठा गटाचे शिवसैनिक असोत की पदीधीकारी शिंदे गटात प्रवेश घेतानाचे दिसून येते दोन्ही तालुक्यातील शेकडो जनाची यादी तयार होत असून उबाठा गटाच्या महिलापदाधिकारी व महिलाशिवसैनिकांचा देखील लवकरच प्रवेशाची तारीख ठरणार असल्याची माहिता प्रवेशासाठी ईच्छूक असलेल्या एका शिवसैनिक नेत्याने दिली तर नेते प्रकाश पाटलांकडून देखील दुजोरा मिळत आहे या दोन तालुक्यातील अनेक शिवसैनिरांनी आजपर्यत शिंदे गटाचा आसरा घेतला असून अनेक पदाधिकारी शिवसैनिक शिंदे गटात सामिळ होणार असल्याचे खात्री लायक वृत्त आहे,

# जम्मू काश्मीर दहशतवादी हल्ल्याचा कल्याण शहर शिवसेनेकडून निषेध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा** /जम्मू काश्मीरमधील पहलगा मध्ये दहशतवादी यांनी पयैटकांनवर भ्याड हल्ला केला, दहशतवादी गोळीबारात 27 पयैटकांचा मुत्यु झाला असून त्यातील तीन डोबिंवली येथील रहिवासी आहेत

सदर घटनेचा निषेध करण्यासाठी शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील यांच्या नेतृत्वाखाली कल्याण शिवाजी चौकात जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला, काळी फित बांधुन जाहीर निषेध नोंदवला

यावेळी शहरप्रमुख रवी पाटील, उपनेत्या विजया पोटे,महिला जिल्हा संघटक छायाताई वाघमारे,,महिला शहर संघटक नेत्रा उगळे, माजी नगरसेवक गणेश जाधव प्रभुनाथ भोईर, जयवंत भोईर, क्षेयस समेळ, संजय पाटील गोरख जाधव,,सुनील खारुक,यांच्या सह शिवसैनिक, महिला आघाडी, युवासैनिक उपस्थित होते,यावेळी शहर प्रमुख रवी पाटील यांनी सांगितले की सदर घटनेचा आम्ही निषेध व्यक्त करतो,काहीही कारण नसताना भ्याड हल्ला दहशतवादी यांनी केला, भारत सरकारने आता पाऊले उचलून दहशतवादी याचा बिमोड केला पाहिजे, तसेच पयैटकांना विचारून नाव धमै त्या प्रमाणे त्यांनी मारले म्हणजे हिंदु लोकानाचा मारले गेले, म्हणून आम्ही पाकिस्तानाचा निषेध व्यक्त करतो.




## बिघडलंय घडलंय



### पांडुरंग बरोरा भाजपवासी झाले पण...

शहापूर तालुका सामाजिक, वैचारिक चळवळ जोपसणारा तालुका या तालुक्याला स्वतःची आगळी वेगळी ओळख आहे. अनेक सामाजिक चळवळीचा उदय याच तालुक्यात झाला, त्यातून अनेक राजकीय सामाजिक वेक्तिमत्व तयार झाली.नावारूपास आली.त्यापैकी माजी आमदार पांडुरंग बरोरा हे एक बेक्तिमत्व आपल्या वडिलांच्या तालमीत तयार होतं तालुक्यातील राजकारणावर स्वतःची पकड निर्माण करत शहापूर विधानसभा मतदार संघाचे लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खंदे समर्थक म्हणून आपल्या वडिलांनंतर पांडुरंग बरोरा यांनी आपली भूमिका कायम ठेवली मात्र सन 2019 च्या निवडणुकीत त्यांना पराभूत होण्याची वेळ आलीती त्यांनी ऐनवेळी केलेल्या पक्ष प्रवेशामुळेच शिवसेना भाजपायुतीचे उमेदवार असून ही, दौलत दरोडा यांनी ऐन विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत या विधानसभा मतदारसंघात विजय हाशील करत पांडुरंग बरोरा यांना पराभूत केले.

एक पंचवार्षिक कार्यकलात पांडुरंग बरोरा यांनी पुन्हा शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश केला. तेथे ही त्यांना स्वताचा वकूब निर्माण करता न आल्याने अखेर लोकसभा निवडणूक 2024 च्या महविकास आघाडीच्या विजया नंतर विधानसभा निवडणुकीत हेच चित्र राहील या हेतूने बरोरा पुन्हा शरद पवार गटात सामील झाले. मात्र विधानसभा निवडणुकीत त्यांचा पुन्हा दरोडा समोर टिकावं लागला नाही. राजकारणात स्थिरता आणि बदल मतदारांच्या मानसिकतेवर अवलंबुन असते, त्याचा फटका पांडुरंग बरोरा ना बसला.सत्ते पासून एक दशक दूर रहाणे महत्वाकांक्षी राजकारण्यांना शक्यच नसते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत पराभवानंतर सत्तेच्या परिघात सामावून घेण्याची लगीन घाई सर्वच राजकारण्यांना असते. त्याच घाई गर्दीत माजी आमदार पांडुरंग बरोरा यांनी नुकताच भाजपात प्रवेश केला आहे.

भाजपात एक प्रभावी नेता म्हणून त्यांना त्यांची छाप निर्माण करण्यासाठी त्यांनी तशा थाटा माठात पक्ष प्रवेश होणे गरजेचे होते. त्यांचा पक्ष प्रवेश तितकासा चर्चेत राहिला नाही. त्यामागील कारणे अनेक असतील ही.

ते स्वतः आमदार राहिले होते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,भाजपा कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याशी त्यांचे निकडचे संबंध होते. मग भाजपा पक्ष प्रवेशात स्वतःच एक शक्तीप्रदर्शन करत पक्ष प्रवेश होणे गरजेचे होते. वरिष्ठ नेत्याशी जवळीक असताना त्यांचा भाजपा प्रवेश एक सोहळा होणे गरजेचे होते. तसा थाट माठ यावेळीच्या पक्ष प्रवेशात दिसले नाही. ही खंत बरोरा समर्थकांना सतावत असावी . हे मात्र नक्की.....

# ३० वर्षांपूर्वी हबल दुर्बीण अवकाशात सोडण्यात आली होती

जेव्हा हबल स्पेस टेलिस्कोप (HST) लॉंच करण्यात आला, तेव्हा सोव्हिएत समाजवादी प्रजासत्ताक संघ अजूनही अस्तित्वात होता, बर्लिनची भिंत उभी होती आणि घरी परतल्यावर, भारतीय क्विझ मास्टर्सना एक उत्तम प्रश्न विचारण्यास मिळाला. २४ एप्रिल २०२० रोजी तीन दशके होतील; या काळात HST ने विश्वाबद्दल आपण ज्या पद्धतीने समजून घेतो ते मूलभूतपणे बदलले आहे.
या दुर्बिणीचे नाव अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ एडविन हबल यांच्या नावावरून ठेवण्यात आले आहे, ज्यांनी प्रथम विस्तारणाऱ्या विश्वाचा सिद्धांत मांडला होता. एचएसटीमुळे खगोलशास्त्रज्ञांना सध्याच्या विस्ताराच्या दराची गणना करण्यास, ज्याला हबल कॉन्स्टंट म्हणूनही ओळखले जाते, अचूकता मिळाली. यामुळे विश्वाचे वय १३.८ अब्ज वर्षे अचूकपणे मोजता आले.
खगोलशास्त्रज्ञांना पृथ्वीच्या वातावरणामुळे धुक्यात न अडकता विश्वाचे दृश्य हवे होते म्हणून हबल प्रक्षेपित करण्यात आले. नासाच्या म्हणण्यानुसार, "वातावरणाच्या विकृतीच्या वर, पावसाळी ढग आणि प्रकाश प्रदूषणाच्या खूप वर" ते ठेवण्यात आले. हबल विश्वाचे अबाधित दृश्य पाहू शकतो. "दोन हत्ती" च्या वजनाचा हा "मोठा स्कूल बस" दुर्बिणी आकाशात त्यांचा डोळा होता.
गेल्या काही वर्षांत एचएसटीने दहा लाखांहून अधिक निरीक्षणे केली आहेत. विश्वाच्या काळात विकसनशील आकाशगंगांचे स्वरूप नोंदवणारे ते पहिले होते. त्याच्या इन्फ्रारेड सेन्सर्सनी हजारो ताऱ्यांचा जन्म नोंदवला आहे. त्याने बहुतेक आकाशगंगांच्या केंद्रांमध्ये प्रचंड कृष्णविवरे असल्याचे नोंदवले आणि



सौरऊर्जेबाहेरील ग्रहांच्या वातावरणीय सांद्रतेचे मोजमाप केले. गुरुत्वाकर्षण लेन्सिंगचा वापर करून खगोलशास्त्रज्ञांना अवकाशातील अंधार पदार्थाचे वितरण मॅप करण्यास अनुमती दिली आहे.
या अंतराळ दुर्बिणीने दहा लाखांहून अधिक निरीक्षणे घेतली आहेत आणि त्यामुळे १६,००० पीअर-रिव्ह्यू केलेले पेपर्स मिळाले आहेत जे ८००,००० पेक्षा जास्त वेळा संशोधन पेपर्समध्ये उद्धृत केले गेले आहेत.
त्याच्या कार्यकाळात, या दुर्बिणीची सहा वेळा देखभाल करण्यात आली आहे, त्यात दोष दूर करण्यात आले आहेत आणि उपकरणे अद्ययावत करण्यात आली आहेत.
एचएसटी आणखी १०-२० वर्षे काम करेल अशी अपेक्षा आहे. जेम्स वेब स्पेस टेलिस्कोप, जो २०२१ मध्ये प्रक्षेपित होणार आहे, तो एचएसटीचा उत्तराधिकारी असेल.

## गीतासार



### अध्याय ९
### राजविद्याराजगुह्ययोगः

श्रीभगवानुवाच इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे । ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ ९-१ ॥

श्रीभगवान म्हणाले, दोषदृष्टीरहित अशा तुला भक्ताला हे अतिशय गोपनीय विज्ञानासहित ज्ञान पुन्हा नीटपणे सांगतो. ते जाणल्याने तू दुःखरूप संसारापासून मुक्त होशील. ॥ ९-१ ॥

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् । प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥ ९-२ ॥

हे विज्ञानासहित ज्ञान सर्व विद्यांचा राजा, सर्व गुप्त गोष्टींचा राजा, अतिशय पवित्र, अतिशय उत्तम, प्रत्यक्ष फळ देणारे, धर्मयुक्त, साधन करण्यास फार सोपे आणि अविनाशी आहे. ॥ ९-२ ॥

अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परन्तप । अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि ॥ ९-३ ॥

हे परंतपा (अर्थात शत्रुतापना) अर्जुना, या वर सांगितलेल्या धर्मावर श्रद्धा नसलेले पुरुष मला प्राप्त न होता मृत्युरूप संसारचक्रात फिरत राहतात. ॥ ९-३ ॥

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना । मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥ ९-४ ॥

जसे पाण्याने बर्फ परिपूर्ण भरलेले असते, तसे मी निराकार परमात्म्याने हे सर्व जग पूर्ण व्यापलेले आहे. तसेच सर्व भूते माझ्यामध्ये संकल्पाच्या आधारावर राहिलेली आहेत. पण वास्तविक मी त्यांच्यामध्ये राहिलेलो नाही. ॥ ९-४ ॥

न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् । भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥ ९-५ ॥

ती सर्व भूते माझ्या ठिकाणी राहिलेली नाहीत. परंतु माझी ईश्वरी योगशक्ती पाहा की, भूतांना उत्पन्न करणारा व त्यांचे धारण-पोषण करणारा असूनही माझा आत्मा वास्तविकपणे भूतांच्या ठिकाणी राहिलेला नाही. ॥ ९-५ ॥

# टिटवाळ्यात बनावट कंपनीच्या नावाखाली १४ लाखांची फसवणूक

## 'बंटी-बबली' जोडगोळी पोलिसांच्या जाळ्यात...

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



टिटवाळा : नोकरी व घरपोच स्वस्त दरात सामान मिळवून देण्याचे आमिष दाखवत टिटवाळ्यातील चामसिटी परिसरात सुमारे १४ लाखांची फसवणूक करणाऱ्या 'शंखेश्वर क्रिस्टल' नावाच्या बनावट कंपनीचा भांडाफोड झाला आहे. या प्रकरणी नविन धनाजी पांचाळ व त्याची पत्नी विद्या पांचाळ या दांपत्याला अटक करण्यात आली असून, त्यांच्यावर टिटवाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
तक्रारदार जितेंद्र बांगर (वय ४०) हे खाजगी बँकेत नोकरीला असून, त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार जानेवारी २०२५ मध्ये आरोपी दाम्पत्य त्यांच्या इमारतीत भाड्याने राहू लागले. त्यांनी रहिवाशांशी मैत्री करून 'शंखेश्वर क्रिस्टल' या कंपनीत नोकरी लावण्याचे व घरपोच कमी दरात वस्तू मिळवून देण्याचे आमिष दाखवले.
सुरुवातीला विश्वास मिळवण्यासाठी त्यांनी काही सामान दिले, परंतु नंतर जास्त नफा व पगार देण्याचे आश्वासन देत त्यांनी फिर्यादीकडून २,८६,००० रुपये रोख व ४३,७०० रुपये ऑनलाइन अशा एकूण ३,२९,७०० रुपयांची रक्कम उकळली. परंतु, यानंतर आरोपींनी कोणताही संपर्क न ठेवता अचानक गायब झाले.
२६ मार्च २०२५ रोजी पहाटे ४ वाजता आरोपींची गाडी (MH05/EL/3084 क्रमांकाची पांढरी एर्टीगा) सीसीटीव्हीमध्ये दिसून आली, ज्यामधून ते इमारतीतून सामानासह निघून जात होते. अधिक चौकशीत समोर आले की, या दाम्पत्याने एकट्या जितेंद्र बांगरच नव्हे तर इमारतीतील इतर २२ रहिवाशांनाही वेगवेगळ्या रकमेची फसवणूक करत एकूण १३,९९,४२५/- रुपयांची रक्कम उकळली.
या घटनेनंतर पोलिसांनी गुन्हे शाखेच्या सहाय्याने सोलापूर विभागातील त्यांच्या लपण्याच्या ठिकाणी छापा टाकून, १८ एप्रिल २०२५ रोजी 'बंटी-बबली' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या जोडगोळीला अटक केली. सध्या हे दोघे टिटवाळा पोलीस ठाण्यात पोलीस कोठडीत असून त्यांच्याकडून इतर फसवणूक प्रकरणांचा तपास सुरू आहे.
या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल मुस्ताक रज्जाक करत आहेत. पोलिसांच्या मते, या आरोपींचा राज्यातील अनेक फसवणूक व चोरीच्या प्रकरणांशी संबंध असण्याचा संशय आहे. रहिवाशांनी पोलिसांकडे वेळेवर तक्रार दिल्यामुळे ही कारवाई शक्य झाली असून, इतर नागरिकांनी देखील अशा प्रकारच्या आमिषांना बळी न पडण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# पेण तालुक्यातील ६४ ग्रामपंचायतींचे सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**हे आरक्षण सन २०२५ ते २०३० या कालवधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायीसाठी लागू असल्याचे प्रांताधिकारी प्रवीण पवार यांनी सांगितले.**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यात ६४ ग्रामपंचायतीच्या आरक्षणाची सोडत प्रांताधिकारी प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात आली. अनेक ग्रामपंचायतीच्या निवडणुका डोळयासमोर असल्याने अनेकांनी अनेक ठिकाणी निवडणुका लांबल्याने प्रशासक आहे.. त्यातच आरक्षण सोडतीमुळे अनेकांच्या मनसुभ्यावर पाणी पडले आहे. अपेक्षित आरक्षण न आल्याने गुडघ्याला बाशिंग बांधलेल्या उमेदवारांची गोची झाल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे थोडा आनंद झाला तर थोडा दुःख ही होत असल्याची स्थिती अनेक ग्रामपंचायतीमध्ये दिसून येत आहे.
मुंबई ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच निवडणूक नियम १९६४ पोट नियम (४) (५) (६) नुसार ग्रामपंचायतीमधील लोकसंख्या, मागील आरक्षण यांचा सखोल अभ्यास करुन अचूक आरक्षण होण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार प्रांताधिकारी प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनखाली सभेचे आयोजन करण्यात आले होते. पेणमधील एकूण ६४ ग्रामपंचायत सरपंच आरक्षण सोडत
सन २०२५-२०३० या कालावधीत ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जागेसाठी खुला वर्ग १, अनुसूचित जमातीसाठी १४ पैकी खुला वर्ग ७ जागा, महिलांसाठी ७ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्गातील १७ जागांपैकी खुला वर्ग ८ जागा, महिलावर्ग ९ जागा, सर्वसाधारण ३२ जागेसाठी खुला वर्ग १६ जागा, महिलावर्ग १६ जागा असे आरक्षण निश्चित करण्यासाठी ही सभा घेण्यात आला होती. हे आरक्षण सन २०२५ ते २०३० या कालवधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायीसाठी लागू असल्याचे प्रांताधिकारी प्रवीण पवार यांनी सांगितले.
यावेळी प्रांताधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, नायब तहसीलदार प्रसाद कलेकर, नायब तहसीलदार नितीन परदेशी, तुषार कामत यांच्यासह युवानेते वैकुंठ पाटील, मंगेश दळवी, संजय डंगर, मुरलीधर भोईर अनेक ग्रामपंचायतीचे आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.
अनुसुचित जाती खुलावर्ग यासाठी एक जागा असल्याने गा-गोदे खुर्द ग्रामपंचायतीचे नाव जाहीर करण्यात आले. अनुसूचित जमातीसाठी एकूण १४ जागा असून खुला वर्ग ७जागा, महिलांसाठी ७ जागा राखीव होत्या. त्यात दूरशेत, वाशी, वढाव, जिते, जोहे, कालेश्री, कणे या ग्रामपंचायतींचा तर महिलांसाठी राखीव वर्गासाठी जिर्णे, अंतोरे, हमरापूर, आमटेम, कळवे, सोनखर, मसद या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी १७ जागांपैकी खुला वर्ग ८ जागा, महिलावर्ग ९ जागा आरक्षित असून रोडे, कांदले, झोतीरपाडा निधवली, मळेघर, शिर्की, वरेडी, रावे, वरवणे या ठिकाणी महिला आरक्षण असून कासू, कुहिरे, वडखळ, बेणसे, शेडाशी, आंबेघर, दिव, खरोशी या ग्रामपंचायती खुल्या वर्गासाठी राखीव आहेत.सर्वसाधारण जागेसाठी एकूण ३२ जागांपैकी खुला वर्ग १६ जागा, महिलावर्ग १६ जागा असून खुला वर्गासाठी बोर्झे दादर, कोपर, बोरी, काराव, मुंढानी, आंबिवली, निगडे, दुष्मी, बळवली, तरणखोप, वरसई, बोरगाव, करंबेली छत्तीसी, पाबळ, सापोली या ग्रामपंचायती असून महिलावर्गासाठी खारपाले, डोलवी, कोलेटी, पाटणोली, कोप्रोली, उबर्डे, शिहू, बेलवडे बुद्रुक, कामार्ली, जावळी, सा-वरसई, वाक्रुळ, महलमीरा डोंगर, करोटी, वाशिवली, वरप या ग्रामपंचायती राखीव जागा आहेत.
यातील बहुतेक ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जाती साठी जे आरक्षण पडले आहे. त्या ठिकाणी अनुसूचित जातीचे संख्या नसल्याने अनेकांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे.

# उल्हासनदीच्या पाण्याची लॅबमध्ये तपासणी करण्याची राष्ट्रवादीची मागणी

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नोवेल साळवे यांचे पत्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : उल्हास नदी साफसफाई करत असताना तसेच जलपर्णी व गाळ काढण्याच्या कामामुळे कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीत आणि उल्हासनगर महापालिका हद्दीत नळातून पिण्याचे पाणी पिवळ्या रंगाचे येत असून नागरिकांच्या आरोग्याला हे पाणी पिऊन धोका निर्माण होऊ नये यासाठी या पाण्याची लॅबोरेटरी मध्ये तपासणी करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.
हल्लीच कल्याण डोंबिवली महापालिका प्रशासनाच्या निरीक्षणाखाली मोहने आंबिवली येथील उल्हास नदीची साफसफाई मोहीम हाती घेण्यात आली आहे. या नदीची साफसफाई करण्याचा उद्देश चांगला व जनहिताचा आहे. परंतु या नदीतून जलपर्णी व गाळ काढत असताना तिथले संपूर्ण पाणी गढूळ होत आहे. इथूनच पाणी जलशुद्धीकेंद्रात पोहोचून सर्व पिण्याचे पाणी महापालिका द्वारे वितरण केले जाते, परंतु दोन चार दिवसांपासून लोकांच्या घरात पिण्याचे पाणी पिवळसर सारखे येत असल्याकारणाने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी राज्य सरकारने आणि स्थानिक प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्याला कुठल्याही प्रकारचे धोका निर्माण होऊ नये म्हणून या पाण्याची लॅबोरेटरी मार्फत तपासणी केल्यानंतरच स्थानिक प्रशासनाने पाणी पुरवठा करावा अशी मागणी नोवेल साळवे यांनी केली आहे.

# डोंबिवलीत ३०० कामगारांना गृहउपयोगी वस्तूंचे वाटप

## प्रसिद्ध कलाकार अक्षता दास यांची उपस्थिती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




डोंबिवली : महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेच्या वतीने नुकतेच डोंबिवली पूर्वेकडील स्व. धर्मवीर दिघे सभागृहात कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या वतीने ३०० कामगारांना गृहउपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी आमदार राजेश मोरे , स्थायी समिती सभापती रमेश म्हात्रे ,कल्याण तालुकाप्रमुख महेश पाटील माजी,नगरसेवक संजय पावशे, उद्योजक विकी हिंगे, ताराराणी ब्रिगेड अध्यक्ष मेघा मोरे, सहकार भारती शैलेश दुरगुडे, पायल मार्बल मालक सुरेश जैन, समाजसेविका रेखा कांबळे, सेफ्टी असोसिएशन विशाल शेटे, रिपब्लिकन नेते आनंद नवसागरे, सिनेअभिनेत्री अक्षदा दास, डॉ. शोभा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.
दरम्यान संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण मिसाळ म्हणाले, कामगार महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेच्या प्रयत्नाने गृहपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले आहे. संघटनेच्या माध्यमातून दरवर्षी कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती दिली जाते. कामगारांच्या मुलींच्या विवाहासाठी आर्थिक मदत केली जाते. तसेच महिला कामगारच्या प्रसूतीकरताही आर्थिक मदत केली जाते. काम करत असताना कामगारांचा मृत्यू झाल्यास कामगाराच्या कुटुंबियांना शासनाची मदत मिळवून देण्यासाठी संघटना शासनाकडे पाठपुरावा करते. संघटनेच्या माध्यमातून आतापर्यंत चार हजार कामगारांना सेफ्टी किटचे वाटप करण्यात आले. तर दोन हजार कामगारांना गृहपयोगी वस्तूंचे वाटप व दोन हजार पेक्षा जास्त कामगारांना शिष्यवृत्ती मिळवून दिली. या कार्यक्रम माध्यमातून यावेळी चारशे कामगारांना गृहपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कामगारांसाठी शासनाच्या योजना संघटनेच्या माध्यमातून पोहोचविल्या जातात. संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण मिसाळ यांना सचिव युवा अध्यक्ष नामदेव भानुसे , खजिनदार विश्वनाथ रेवगडे, सहखजिनदार रामचंद्र वाघ, सहसचिव गजानन डांगे, केद्रिय कमिटी सदस्य चंद्रकांत गायकवाड, कमलाकर पाटील, युवा अध्यक्ष केशव मिसाळ, अध्यक्ष वंदना जाधव, कल्याण जिल्हाध्यक्ष भुजंग कोरके, कल्याण शहराध्यक्ष संजय मस्के, बद्रीनाथ मखरे या संघटनेचे आदि पदाधिकारी मोलाचे सहकार्य करतात.

## महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक ठाणे जिल्ह्याच्या वतीने
# पहेलगाम हल्ल्याचा जाहीर निषेध

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक, ठाणे, जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या घृणास्पद दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करते. हा हल्ला केवळ निष्पाप नागरिकांच्या जीवनावरील अमानुष आक्रमण नाही, तर धर्माच्या नावाखाली मानवतेची निर्घृण हत्या करण्याचे कृत्य आहे.
महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक, ठाणेचे जिल्हाध्यक्ष श्री. कृष्णकांत मधुकर मलिक यांनी सांगितले की, निष्पापांविरुद्धची अशी हिंसा सभ्यतेच्या मूल्यांवरील थेट हल्ला आहे. हा आपल्या देशाच्या एकता आणि अखंडतेवरचा हल्ला आहे. सर्व राजकीय पक्ष आणि संघटनांनी आपापले मतभेद विसरून या दहशतवादी कृत्याविरुद्ध एकजूट झाले पाहिजे. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक या घटनेचा तीव्र निषेध करते आणि देशातील नागरिकांना शांतता, संयम आणि एकता राखण्याचे आवाहन करते.
श्री. कृष्णकांत मधुकर मलिक पुढे म्हणाले की, धर्माच्या नावाखाली अशा हत्या करणे हा मानवतेच्या इतिहासावरील कलंक आहे. आम्ही मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. संपूर्ण शिक्षक समुदाय दहशतवादाविरुद्ध एकजूट होऊन मानवता आणि राष्ट्रीय एकतेच्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहे.
महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक पीडित कुटुंबांसोबत आपली एकजूटता व्यक्त करते आणि सरकारला अपेक्षा करते की दहशतवादाविरुद्ध कठोर कारवाई करून दोषींना शिक्षा दिली जाईल.


# शिवसेना महिला जिल्हा संघटक पदी रेखाताई कंटे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : ठाणे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सौ.रेखाताई काशिनाथ कंटे यांची कल्याण -मुरबाड विधानसभा शिवसेना उबाठा पक्षाच्या जिल्हा संघटक पदी निवड झाली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची नविन पदाधिकारी कार्यकारणी पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने जाहीर करण्यात आली असून मुरबाड मधून मागिल पंचवार्षिकला सरळगाव गटातून रेखाताई कंटे जिल्हा परिषदेवर शिवसेनेतून निवडून आल्या होत्या.
शांत, सयंमी, सुसंस्कृत,अभ्यासू राजकीय चेहरा म्हणून त्यांच्या कडे पाहिले जाते.त्यांच्याकडे उत्तम महिला संघटन आहे.महिला सक्षमीकरणासाठी त्यांचा नैहमी पुढाकार असतो.एक सामंजस्य, मितभाषी, मनात सद्विचार आणि जिभेवर साखर असणारे एक महिला नेतृत्व पक्षाला मिळाले आहे.भविष्यात पक्ष संघटनेला निश्चित त्यांचा फायदा होईल अशा प्रतिक्रिया त्यांच्या या निवडी नंतर येत असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## आरोग्य
# डिहायड्रेशन आणि उच्च रक्तदाब



शरीरात निर्माण होणारी पाण्याची कमतरता आणि वाढलेला रक्तदाब यांच्यात थेट संबंध नाही, परंतु तीव्र डिहायड्रेशनमुळे रक्तदाब कमी होऊ शकतो. पाण्याचं योग्य प्रमाण राखणं प्रत्येकासाठी महत्वाचं आहे.
शरीरात पाण्याची कमतरता असल्याची लक्षणं
अ. त्वचा कोरडी पडू लागते. रॅश येऊन खाज सुटते.
ब. लघवीचा सौम्य पिवळा रंग बदलून गडद पिवळा होतो.
क. श्वासाला असह्य दुर्गंधी येते.
ड. वारंवार डोकं दुखून अंगात आळस भरतो.
डिहायड्रेशन आणि उच्च रक्तदाबाचे उपाय
अ. डिहायड्रेशन टाळण्यासाठी पुरेसं पाणी प्या.
ब. रोज सकाळी उठल्यावर सोसेल एवढं गरम पाणी प्यायची सवय लावा.
क. लिंबू पाणी प्यायल्याने रक्तदाब नियंत्रणात राहतो.
ड. नियमित व्यायाम केल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते आणि रक्तदाब नियंत्रणात राहतो.

# डॉ.देवीदास बामणे यांना आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराने सन्मानित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : 'महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, पनवेल तालुका पत्रकार संघा च्या प्रथम वर्धपानदिनानिमित्त सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा, पत्रकार इत्यादि क्षेत्रात देण्यात आलेले पुरस्कारा पैकी डॉ.देवीदास बामणे यांना 'राज्य शिक्षक पुरस्कार ' देवून सम्मानित करण्यात आला.
प्रा.बामणे हे भाऊसाहेब नेने कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेण, जि.रायगड येथे गेले 30 वर्षे हिंदी विषयाचे प्राध्यापक व अध्यक्ष, हिंदी विभागत कार्यरत आहेत. सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उत्तम कार्य असून.दर वर्षी काहीं गरीब होतकरू विद्यार्थ्यांची फी भरून त्यांना पुढील शिक्षण घेण्यास मदत करत आहेत. .पेण येथील रेल्वेचा प्रश्न तसेच सामाजिक कार्य साठी अनेक वेळ अंदोलन केले आहे. अनेक कवी सम्मेलनात सहभागी असून त्यांचे कार्य अनेक वर्षापासून सुरू आहे. त्यांचा एक पुस्तक प्रकाशित झाला आहे. दोन पुस्तक, एक काव्य संग्रह व दोन अनुवाद केलेले पुस्तक लवकरच प्रकाशित होणार आहेत . अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यावर्षी 'महाराष्ट्र हिंदी परिषद' या साहित्य क्षेत्रात नावाजलेले संस्थेच्या संयुक्त सचिव म्हणून पाच वर्षांसाठी बिन विरोध निवड झाली आहे. भारतातील अनेक साहित्यिक क्षेत्रात अनेक पदावर कार्यरत आहेत. पेण मराठी साहित्य मंडळाच्या अध्यक्ष पदावर अलिकडे बिनविरोध निवड झाली आहे. म्हणून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील अनेक जण नेहमी कौतुक करीत आहेत.



# दिघा धरण नवी मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्याची सुचना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** – ठाणे आणि नवी मुंबई शहरातील सर्वच रेल्वे स्थानकांमध्ये प्रवाशांसाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधा पुरविण्यासंबंधी आयोजित केलेल्या बैठकीत खासदार नरेश म्हस्के यांनी दिघा येथील धरण नवी मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्याची सुचना रेल्वे प्रशासनाला केली. हे धरण हस्तांतरीत झाल्यास दिघा येथील पाणी समस्या दूर होण्यास मदत होईल, असा दावाही त्यांनी केला आहे.



ठाणे आणि नवी मुंबई विभागीय रेल्वे प्रवाशांच्या समस्या आणि मागण्यासंदर्भात खासदार नरेश म्हस्के यांनी मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक हिरेश मीना यांची बुधवारी भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. यावेळी झालेल्या बैठकीत नवी मुंबईतील स्थानके आणि ठाणे रेल्वे स्टेशनवरील विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली.

वर्तकनगर येथील आरक्षण खिडकी लवकरात लवकर सुरू करण्याबाबत खासदार म्हस्के यांनी निर्देश दिले. तसेच दिघा, भोलानगर, अनंत नगर रेल्वे खालून गणपती पाडा येथे राहणाऱ्या रहिवाश्यांकरिता जाण्या-येण्याकरिता भुयारी मार्ग बनवण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. त्यावर रेल्वे महाव्यवस्थापकांनी समस्यांवर तोडगा काढण्याचे तसेच लवकरच स्थानकांचा पाहणी दौरा करणार असल्याचे आश्वासन दिले.

दिघा परिसरातील नागरिकांना गेल्या काही महिन्यांपासून पाणी टंचाईची समस्या भेडसावत आहे. या भागाला दिघा धरणातून पाणी पुरवठा झाला तर येथील पाण्याची समस्या सुटू शकेल, असे अंदाज वर्तविले जात असून तशी मागणीही गेल्या काही महिन्यांपासून होत आहे. नेमकी ही बाब लक्षात घेऊन खासदार म्हस्के यांनी दिघा येथील धरण नवी मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यासंदर्भात बैठकीत चर्चा केली. हे धरण हस्तांतरीत झाल्यास दिघा येथील पाणी समस्या दूर होण्यास मदत होईल, असे खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वे विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

स्थानकातील समस्यांवर चर्चा

ठाणे आणि नवी मुंबई शहरातील सर्वच रेल्वे स्थानकांमधील शेड पत्रे, पंखे, विद्युत दिवे, ध्वनिक्षेपक दुरूस्ती करणे. बाहेरील पेव्हर ब्लॉक दुरूस्त करणे. स्थानकाबाहेरचा परिसर स्वच्छ करणे. रेल्वे स्थानकांमध्ये पिण्याच्या पाण्याचे कुलर बसविण्यांत यावे. दिघा ते तुर्भे स्थानकाबाहेर बुट पॉलीश धारकांना जागा देणे. काही स्थानकांमध्ये सरकते जिने बसविणे.

ऐरोली स्थानकामध्ये आरक्षण खिडकी सुरू करणे. बहुमजली वाहनतळासह कोपरखैरणे स्थानकाबाहेरील पार्किंग व्यवस्था सुस्थितीत करणे. रात्रीची गस्त वाढविणे. रबाले स्थानक पश्चिमेकडील तिकीट खिडकी रात्री ११ वाजेपर्यंत सुरू ठेवणे. सानपाडा-जुईनगर रेल्वे पुलाचे थांबलेले काम लवकर सुरू करणे अशा अनेक प्रलंबित समस्यांसंदर्भात म्हस्के यांनी बैठकीत चर्चा केली. या समस्यांबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी, अशी सूचनाही त्यांनी केल्या.

# ठाणे जिल्ह्याची ग्रामीण गृहनिर्माण मोहिमेतील १०५ टक्के घरकुले पूर्ण!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे / दि. २३** – महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागांतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनेंतर्गत मुख्यमंत्री यांनी १०० दिवसांचा कृती कार्यक्रम अंतर्गत ठाणे जिल्ह्यात उल्लेखनीय प्रगती करत १०५% उद्दिष्ट पूर्ण केले आहे. ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्याचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३० डिसेंबर, २०२४ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी १०० दिवसांची उद्दिष्टपूर्ती मोहीम जाहीर करण्यात आली होती. या मोहिमेअंतर्गत १३ लाख घरकुलांना मंजुरी, ३ लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित (₹४५० कोटी), १ लाख घरकुलांचे भौतिकरूपाने पूर्ण बांधकाम, ५,००० लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देणे उद्दिष्टे दिली गेली होती. या पार्श्वभूमीवर, ठाणे जिल्ह्याने अत्यंत सराहनीय कामगिरी करत निर्धारित १६७१ घरकुलांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत १७५७ घरकुले पूर्ण केली, जी १०५% कामगिरी आहे.

या यशामध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, गटविकास अधिकारी पंचायत समिती शहापूर नम्रता जगताप, गटविकास अधिकारी पंचायत समिती मुरबाड लता गायकवाड, गटविकास अधिकारी पंचायत समिती कल्याण संजय भोये, गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबरनाथ पंडित राठोड, गटविकास अधिकारी पंचायत समिती भिवंडी गोविंद खामकर , तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी घेतलेल्या परिश्रमांचे फलित स्पष्टपणे दिसून येते. हा उपक्रम प्रशंसनीय आणि प्रेरणादायी असून, अनेक गरजू कुटुंबांना हक्काचे निवासस्थान मिळाले आहे, ज्यामुळे त्यांचे जीवन अधिक सुरक्षित आणि स्थिर झाले आहे.

# शिवसेनेची टीम श्रीनगर मध्ये दाखल

## राज्यातील प्रवाशांना सुखरूप परत आणण्याचे प्रयत्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**श्रीनगर :-** जम्मू आणि काश्मीरमधील पेहेलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात राज्यातील सहा पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. एकीकडे या पर्यटकांचे पार्थिव आणि त्यांच्या नातेवाईकांना सुखरूप राज्यात परत आणण्याचे प्रयत्न सुरू झालेले असतानाच आता तिथे अडकलेल्या इतर पर्यटकांना सुखरूप राज्यात आणण्याचे प्रयत्न देखील सुरू झाले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे मदत पथक काल रात्रीच मुंबईहून श्रीनगरसाठी रवाना झाले आहे. या पथकात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे स्वीय सहाय्यक अभिजित दरेकर, डोंबिवलीचे शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेश कदम आणि इतर सहकाऱ्यांचा समावेश आहे. या दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना विमानात बसवून रवाना केल्यानंतर आता जम्मू काश्मीरमध्ये अडकलेल्या बाकीच्या पर्यटकांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. ठाणे आणि डोंबिवली येथून काश्मीर सहलीसाठी गेलेल्या 40 आणि 55 जणांच्या ग्रुपशी या मदत पथकाने संपर्क केला असून त्यांना परत पाठवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच त्यांच्यासह तिथे अडकलेल्या राज्यातील इतर पर्यटकांच्या देखील ते संपर्कात असून त्यांना देखील सुखरूप राज्यात आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वतः या मदत कार्यावर लक्ष ठेवून असून कोणत्याही परिस्थितीत राज्यातील पर्यटकांना सुखरूप परत आणण्यात येईल असे त्यांनी सांगितले आहे. मात्र सध्या श्रीनगर मधील परिस्थिती नाजूक असून पर्यटकांना परत आणण्यासाठी यंत्रणांशी संपर्क साधून समन्वय साधावा लागत आहे. ही सर्व प्रक्रिया पार पाडण्याचे शर्थीचे प्रयत्न शिवसेनेच्या मदत पथकाच्या वतीने करण्यात येत असून लवकरच केंद्र शासनाच्या मदतीने या पर्यटकांना सुखरूपपणे राज्यात आणले जाईल असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे.

# अनधिकृत शाळांपासून सावध !

## प्राथमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांचे पालकांना आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दि. 23 / ठाणे** – शैक्षणिक वर्ष 2025-26 साठी प्रवेश प्रक्रिया सुरु असून, या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात शासन परवानगीशिवाय काही अनधिकृत शाळा सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.

या शाळांमधून राज्य शिक्षण मंडळ, सीबीएसई, आयसीएसई, आयबी इत्यादी नामांकित बोर्डांच्या नावाखाली आकर्षक जाहिराती करण्यात येत असून त्यामुळे पालकांची फसवणूक होण्याचा धोका वाढला आहे. या संदर्भात शिक्षणाधिकारी (प्राथमिक), बाळासाहेब राक्षे यांनी पालकांना सावध राहण्याचे आवाहन करत स्पष्ट केले आहे की "पालकांनी आपल्या पाल्याच्या शैक्षणिक भवितव्यासाठी शाळेची शासन मान्यता आहे की नाही, याची खातरजमा करूनच प्रवेश घ्यावा. अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेतल्यास होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस सर्वस्वी पालकच जबाबदार असतील." बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 अंतर्गत अनधिकृत शाळांवर दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. ठाणे जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात एकही अनधिकृत शाळा सुरु राहणार नाही यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.

**अनधिकृत शाळांची यादी**

१) अनिरुध्द हायस्कूल, व ज्यूनिअर कॉलेज कात्रप पनवेल हायवे बदलापुर (पु.), ता.अंबरनाथ, जि.ठाणे.
२) श्री.चेतन्य टेक्नो स्कूल सर्व्हे नं.77, आर्यन 1 ठाणेकर शिरगाव बदलापुर (पु.), ता.अंबरनाथ, जि.ठाणे.
३) स्टार लाईट्स इंटरनॅशनल स्कूल सोनिवली गांव, बदलापुर (प.), ता.अंबरनाथ ,जि.ठाणे.
४) नेसम इंग्लिश मिडीयम स्कुल, कडसावरे गांव, वांगणी (प.), ता.अंबरनाथ, जि.ठाणे.
५) रुद्र इंटरनॅशनल स्कूल,डोणे, वागंणी (प.),ता.अंबरनाथ, जि.ठाणे.
६) नवजीवन इंटरनॅशनल स्कूल, वागंणी(प.), ता.अंबरनाथ, जि.ठाणे.
७) जी.के.इंग्रजी हायस्कूल, मु.पो.खडवली, ता.कल्याण, जि.ठाणे.
८) लिओ हायस्कूल, काल्हेर, ता.भिवंडी, जि.ठाणे.
९) नॅशनल इंग्लिश स्कूल, दापोडे, ता. भिवंडी, जि.ठाणे.
१०) श्री.चैतन्य टेक्नो स्कूल सोनाळे, ता. भिवंडी, जि.ठाणे.
११) विद्याप्रबोधनी इंग्लिश मिडीयम स्कूल झिडके (अंबाडी), ता.भिवंडी, जि.ठाणे.
१२) डिझाईन ग्रेस हायस्कूल, वज्रेश्वरी, ता.भिवंडी,जि.ठाणे.
१३) विनर्स इंग्लिश स्कूल, काबे, ता.भिवंडी, जि.ठाणे.
१४) अग्निमाता इंग्लिश स्कूल, पिंपळास, ता.भिवंडी, जि.ठाणे.
१५) आर.एन.इंग्लिश स्कूल, कोन, ता.भिवंडी, जि.ठाणे



# अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने पहलगाम हल्ल्याचा निषेध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पहलगाम (जम्मू-कश्मीर) येथील अमानवी आतंकवादी हल्ल्याच्या विरोधात अभाविप कडून ठाणे रेल्वे स्थानकात आज तीव्र निषेध आंदोलन –जम्मू-कश्मीरमधील रमणीय पर्यटन स्थळ असलेल्या पहलगाम येथे झालेल्या अमानवी आतंकवादी हल्ल्याचा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने आज, दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी, ठाणे रेल्वे स्थानक येथे तीव्र निषेध करण्यात आला.

निर्दोष पर्यटकांवर धर्म विचारून करण्यात आलेला गोळीबार हे केवळ भ्याड कृत्य नसून, भारताच्या सामाजिक ऐक्यावरील थेट हल्ला आहे. या हल्ल्यात २६ निरपराध नागरिकांचे बळी गेले असून, अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत.या पार्श्वभूमीवर अभाविपच्या कार्यकर्त्यांनी ठाणे रेल्वे स्थानकावर जोरदार निषेध नोंदवत, 'आतंकवादाचा बंदोबस्त करा', 'निर्दोषांच्या हत्यांना माफ नाही' अशा घोषणा दिल्या. उपस्थित नागरिकांनीही या आंदोलनात सहभाग घेत निष्पाप बळींच्या आत्म्यांना श्रद्धांजली अर्पण केली आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असल्याचे जाहीर केले.हा हल्ला पुन्हा एकदा स्पष्ट करतो की देशाच्या एकतेला खिळ बसवण्यासाठी अतिरेकी शक्ती सक्रिय आहेत. मात्र अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, ठाणे हे पुन्हा एकदा ठामपणे सांगू इच्छिते की, भारताची एकता, अखंडता, शांततेवर कुणीही आघात करू शकत नाही. आम्ही केंद्र सरकारकडे आणि सुरक्षायंत्रणांकडे मागणी करतो की, या घटनेतील दोषींना कठोरात कठोर शिक्षा मिळावी आणि जम्मू-कश्मीरमधील नागरिक व पर्यटक यांच्या सुरक्षेची प्रभावी हमी दिली जावी.

# कोकणचे दुःख कोण दूर करेल?

कोकणात माकड आणि वानर हे दोन प्राणी नसले तर कोकण समृद्ध होईल. गेली कित्येक वर्षे न मारल्यामुळे काहिवर्षात यांची संख्या शंभरपटीने वाढली आहे. ग्रामीण भागात नागरिक कष्ट करून स्वर्ग निर्माण करतील. आज लाखो रुपयांचे कष्ट पाण्यात जात आहेत. हे दुःख कोणाला समजेल काय? आंबा राखणीसाठी आज लाखो रुपये खर्च होत आहेत. केळी, भाजीपाला, नारळ, फळभाज्या, फणस, चिकू, पेरू, पपई , शेवगा, कुळीथ, उडीद, इ चे लाखो रुपयांचे उत्पन्न ही जोडी आणि त्यांची प्रचंड वाढलेली जमात फस्त करते.शिवाय नळे, पत्रे फोडणे यांचे नुकसान वेगळे. माकडे तर घरात घुसून नासधूस करायला लागली आहेत. अंगावर येण्याचे धैर्य त्याच्याकडे वाढत चालले आहे. आर्थिक नुकसान , हाकलण्याचे शारीरिक नुकसान आणि वेदना, हतबलता चे मानसिक नुकसान...किती सोसायचे? मागे मी पंतप्रधान कार्यालयाकडे याबाबत मांडले होते त्यावेळी वनाधिकारी माझ्याकडे येऊन नुकसान भरपाई जीआर देऊन गेले. त्यात प्रचंड त्रुटी आहेत. हे त्यांनाही माहीत आहे. पंचनामा त्यावरील सह्या, खाल्लेले नुकसान कसे दाखवणार,राखण साठी होणारा त्रास, नळे,पत्रे फोडलेले इ. बाबत भीक नको पण कुत्रा आवर अशी स्थिती आहे. आज आम्ही कोकण सोडून इतर ठिकाणच्या भाजीपाला,शेवगा,चिकू,पेरू,केळी यांच्या बहरलेल्या बागा पाहतो. आम्ही आंबा, पपई,शेवगा, चिकू, पेरू, केळी, भाजीपाला इ. चे प्रचंड उत्पादन घेऊ शकतो. पण आम्ही हतबल आणि असहाय आहोत. खरतर कुणी वालीच नाही असं झालंय. हिमाचल प्रदेश मध्ये वानर आणि माकडे यांना उपद्रवी पशु जाहीर करून मारायला सुरुवात केली शिवाय मारण्यासाठी अनुदान देणे सुरू केले असे वाचनात आले. महाराष्ट्रातसुद्धा असं करण्याची गरज आहे. अन्यथा भविष्यात कोकणातील शेतकरी आत्महत्या करू लागला तर आश्चर्य वाटायला नको. आज कोकणातील शेतकरी आत्महत्या करत नाही कारण इथे एक पीक पद्धतीऐवजी बहुपिक पद्धत आहे .दोन माड,दोन फणस,थोडी शेती,दोन कलमे,चार जांबी इ प्रत्येक घरात असल्याने त्याला काहीतरी मिळतं. मात्र आज वानर,माकडांनी त्यावर घाला घातला आहे. कोकणातील ग्रामीण भागातील ही परिस्थिती कोणी लक्षात घेईल काय? शहरात बसून सल्ले देणे खूप सोपे आहे. एकदा राहून अनुभवा..या परिस्थितीतून कोकणी माणसाला दिलासा मिळेल काय? माणूस जगला पाहिजे की प्राणी जगला पाहिजे हे सुद्धा एकदा ठरवण्याची गरज आहे. सरकार उपद्रवी पशु म्हणून वानर,माकडे याना जाहीर करेल काय? नाहीतर रीतसर पत्र देऊन महिनाभरात आता उपोषणाला बसणार आहे.



# भाजप मोहने टिटवाळा मंडळ अध्यक्ष पदी शक्तीवान भोईर यांची तिसऱ्यांदा निवड


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** भारतीय जनता पक्षाच्या मोहने टिटवाळा मंडळाच्या अध्यक्ष पदि पुन्हा म्हणजे तिसऱ्यादा शक्तीवान भोईर याची निवड करण्यात आली आहे,भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष व मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, तसेच भाजपचे कायैकारी प्रदेश अध्यक्ष व माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तसेच जेष्ठ नेते व माजी मंत्री जगन्नाथ पाटील, निवडणूक प्रमुख शशिकांत कांबळे, जिल्हा अध्यक्ष नाना सुयैवंशी, कल्याण जिल्हा महिला अधयक्षा रेखाताई चौधरी यांच्या उपस्थितीत कल्याण जिल्ह्यातील मंडळ अध्यक्ष निवड करण्यात आली आहे,मोहने टिटवाळा मंडळाच्या अध्यक्ष पदि तिसऱ्यादा शक्तीवान भोईर याची निवड करण्यात आली आहे,

येणाऱ्या महापालिका निवडणुकीत नक्कीच भाजप पक्षाला फायदा होईल, माजी उपमहापौर उपेक्षा शक्तीवान भोईर यांनी केलेल्या विकास कामे याचा फायदा ही होईल, शक्तीवान भोईर याची अध्यक्ष पदि निवड झाल्याने माजी आमदार नरेंद्र पवार सह कायैकतै यांनी आनंद व्यक्त केला आहे, व असंख्य कायैकतै यांनी अभिनंदन केले आहे.

# आई गावदेवी नडगाव पालखी सोहळा संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**खडवली**/भक्तांच्या हाकेला धावणारी व नवसाला पावणारी, तसेच भक्तावर आलेले संकट दुर करणारी आई गावदेवी माता नडगाव पालखी सोहळा निमित्ताने विविध कायैक्रमाचे आयोजन ग्रॉंमस्थ मंडळ नडगाव यांच्या वतीने गावदेवी मंदिरात करण्यात आले होते,सकाळी आई गावदेवी मातेचा अभिषेक सोहळा पार पडला, त्या नंतर होम हवन करण्यात आले,व संध्याकाळी पालखी सोहळयास सुरुवात गावदेवी मातेचा मंदिर पासून करण्यात आली, संपूर्ण पालखी सोहळा नडगाव गावातून काढण्यात आला, प्रत्येक घराजवळ पालखीची पुजा आरती करीत होते, पालखीत मोठ्या संख्येने सवै ग्रॉंमस्थ सहभागी झाले होते. ढोल ताशांच्या गजरात फटाक्यांची अतिशीबाजी करीत पालखी संपूर्ण भागात फिरविण्यात आली, पालखी सोहळा संपल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, तसेच डबरबारी भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, कायैक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी ग्रॉंमस्थ मंडळ नडगाव यांनी मोलाचे सहकार्य केले, आंनदमय वातावरणात पालखी सोहळा पार पडला,गावदेवी मातेचे पुजारी दुंदाराम लोणे यांनी सवै भाविकांना शुभेच्छा दिल्या.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com




# रवी गिते यांची कोकण विभागीय माहिती उपसंचालकपदी पदोन्नती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई, दि. 23 एप्रिल :–** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील वरिष्ठ अधिकारी रवी गिते यांनी आज कोकण विभागीय माहिती उपसंचालक या पदाचा कार्यभार स्वीकारला. नवी मुंबईतील कोकण भवन येथे आयोजित छोटेखानी कार्यक्रमात प्रभारी उपसंचालक श्रीमती अर्चना शंभरकर यांच्याकडून त्यांनी पदाचा कार्यभार स्वीकारला.

याप्रसंगी ठाण्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, कोंकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष मनोज जालनावाला, सहायक संचालक संजिविनी जाधव-पाटील, उपसंपादक प्रविण डोंगरदिवे, पत्रकार मच्छिंद्र पाटील, कोंकण विभागीय कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

सामान्य प्रशासन विभागाच्या २२ एप्रिल रोजी काढलेल्या आदेशानुसार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सात वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपसंचालक (माहिती) पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. या यादीत जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा म्हणून कार्यरत असलेले रवी गीते यांचाही समावेश आहे.

श्री. गिते यांचे पत्रकारितेपासून शासकीय सेवेपर्यंतचे प्रवास अत्यंत उल्लेखनीय ठरले आहेत. शासकीय सेवेत येण्यापूर्वी त्यांनी लोकपत्र, नवराष्ट्र आणि सामना या प्रमुख दैनिकांत पत्रकार म्हणून कार्य केले. त्यांच्या पत्रकारितेतील अनुभवाचा त्यांनी माहिती विभागातील सेवेमध्ये प्रभावीपणे उपयोग केला आहे.

शासकीय सेवेत रुजू झाल्यानंतर त्यांनी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात सहायक संचालक म्हणून सुरुवात केली. त्यानंतर चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये त्यांनी जिल्हा माहिती अधिकारी म्हणून यशस्वीपणे कार्य केले. सध्या ते वर्धा जिल्ह्यात जिल्हा माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते.

त्यांच्या पदोन्नतीनंतर आता त्यांनी कोकण विभागीय माहिती उपसंचालक या नव्या आणि जबाबदारीच्या पदावर रुजू होत कोकण विभागातील शासकीय माहिती व्यवस्थापनाला अधिक सक्षम दिशा देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यांच्या कार्यकुशलतेचा आणि अनुभवाचा फायदा कोकण विभागाला निश्चितच होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# तुम्ही एकत्र याल तो दिवस महाराष्ट्रासाठी दिवाळी दसरा डोंबिवलीत झळकले बॅनर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** उद्धव ठाकरे व राज ठाकरे एकत्र यावे यावर अवघ्या महाराष्ट्रात नव्हे तर देशभरातील चर्चा सुरु आहे. याआधी अनेक शिवसैनिकांनी दोन्ही ठाकरे बंधूनी एकत्र या करता देवाकडे प्रार्थना केली होती. मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे एकत्र आले तर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणच बदललेल अशी चर्चा रंगली आहे. 'दोन्ही ठाकरे बंधूनी एकत्र या' असे बॅनरमुंबईतील शिवसेना भवन येथे लावले आहेत. तुम्ही एकत्र यायला तो दिवस महाराष्ट्रासाठी दिवाळी दसरा' असा बॅनर डोंबिवली पश्चिमेकडील स्टेशन बाहेर लावण्यात आला आहे. 'ठाकरे बंधू महाराष्ट्रातील जनता जनता तुम्ही एकत्र येण्याची आतुरतेने वाट पाहत आहे. तुम्ही एकत्र यायला तो दिवस महाराष्ट्रासाठी दिवाळी दसऱ्यापेक्षा मोठा दिवस असेल दोघांनी एकत्र आले पाहिजे ही काळाची गरज आहे मराठी माणसासाठी मुंबईसाठी




महाराष्ट्रासाठी व महाराष्ट्रात चाललेल्या गचाळ व निज गलिच्छ राजकारणासाठी नुसत्या बातमीने बघा सर्वसामान्य सामान्य माणसाला किती आनंद झालाय आणि जेव्हा हे सत्यात उतरेल तेव्हा तर काय होईल हा विचार करा फक्त माझ्यासाठी लवकर दोघी ठाकरे बंधूंनी एकत्र यावे' अशा आशयचा बॅनर निष्ठावंत शिवसैनिक रोहन अनंत पाटील, राहुल जयवंत चौधरी व शशांक शिवाजी इंदुलकरयांनी लावला आहें.

## सामाजिक क्षेत्रातील अनुकरणीय कार्यासाठी
# पोस्को महाराष्ट्र स्टीलचा रोटरीतर्फे सन्मान




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**बोरघर :** स्टील उद्योग क्षेत्रात आघाडीचे नाव असलेल्या पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीला शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल "रोटरी सीएसआर पुरस्कार २०२५" या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. रोटरी इंटरनॅशनल डीस्ट्रीक्ट ३१३१ (रायगड आणि पुणे जिल्हा) ने आयोजित केलेला रोटरी सीएसआर पुरस्कार २०२५ समारंभ १८ एप्रिल २०२५ रोजी पुणे येथील हयात रीजन्सी येथे आयोजित करण्यात आला होता. यामध्ये सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कंपन्यांना सन्मानित करण्यात आले.

माणगांव तालुक्यातील विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून शिक्षण, पर्यावरण, आरोग्य, महिला सक्षमीकरण तसेच इतर कल्याणकारी उपक्रम सातत्याने राबवत असते तसेच आसपासच्या परीसातील स्थानिक लोकांचे जीवनमान उचंविण्यावर आणि सक्षमीकरण करण्यावर नेहमीच भर दिला आहे.

कंपनी मार्फत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, शाळांच्या मुलभूत सुविधांचा विकास व गुणवत्ता सुधारणा, शाळांमध्ये सिस्टरहूड रिलेशनशिप प्रकल्प, विज्ञान संच वाटप, शाळांमध्ये ई-लर्निंग चा सेट-अप, संगणक संच वाटप, विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी बस ची व्यवस्था, उच्चशिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती असे विविध उपक्रम राबविले जातात.पोस्को कंपनी शिक्षण क्षेत्रामध्ये करत असलेल्या उपक्रमांचे निवड समितीने कौतुक केले. हा पुरस्कार केवळ आत्तापर्यंत केलेल्या कामगिरीचीच कबुली देत नाही तर एक चांगली सामाजिक चळवळ निर्माण करण्याच्या दिशेने आमचा प्रवास सुरू ठेवण्यासाठी आम्हाला प्रेरणा देतो, अशी भावना यावेळी कंपनीच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली.

# कोंडेसाखरे ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी गणेश शिंदे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील ग्रामपंचायत कोंडेसाखरे उपसरपंच पदी गणेश शिंदे यांची बिनविरोध निवड झाली आहे. ठाणे जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष तथा ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सुभाष पवार यांनी नवनिर्वाचित उपसरपंच गणेश शिंदे यांना शाल , श्रीफळ व फुलगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी बाळकृष्ण शिंदे, दत्तात्रेय चव्हाण, बबन शिंदे, भगवान शिंदे, दिनेश शिंदे, श्याम शिंदे उपस्थित होते.

## साखरपाडा मानिवली (गोंधळी) येथे
# नवीन नळपाणी योजनेचा लोकार्पण सोहळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील साखरपाडा मानिवली (गोंधळी )येथे नवीन नळेपाणी योजनेचे लोकार्पण सोहळा नुकताच ठाणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष पवार यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी माजी सरपंच बळीराम आगविले ,चिंतामण महाराज गोंधळी, बाळू बाबरे, बबन कराले,, चेतन गोळे, संतोष भांडे, शिवाजी भांडे, सरपंच वसंत गोंधळी , मुकुंद धुमाळ, अशोक गोंधळी, जयराम गोंधळी, गुरुनाथ वारघडे, लहू गोंधळी, यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिलावर्ग उपस्थित होते

# मुरबाड बस आगारात अखेर नविन पाच बसेस दाखल

## आमदार कथोरेंच्या वतीने लोकार्पण !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील जनतेला जुन्या व भंगार बस गाड्यामधून गेले अनेक दिवस प्रवास करावा लागत होता. या जुन्या बस गाड्यांचे अनेक वेळा अपघातही झाले आहेत. या संदर्भात अनेक वेळा प्रसार माध्यमातून आवाज देखील उठवण्यात आला होता. मुरबाड विधानसभेचे स्थानिक आमदार किसन कथोरे हे मुरबाड करांसाठी 10 नविन बसेस मिळण्यासाठी शासनदरबारी प्रयत्नशिल होते. ठाणे वाहतुक नियंत्रक सागर पळसुळे यांचा ही पाठपुरावा सूरू होता. अखेर सर्वांच्या प्रयत्नांना यश येऊन मुरबाड बस आगारासाठी नविन 5 बसेस महामंडळाकडून देण्यात आल्या आहेस.उर्वरित 5 बसेस सुद्धा लवकरच मिळतील असे




आश्वासन आमदार कथोरे यांनी दिले आहेत.

या नविन बसेसचे लोकार्पण आज आमदार कथोरेंच्या अनुपस्थित माजी जिल्हा परिषद सदस्य उल्हास बांगर ,मुरबाड नगरपंचायतचे नगराध्यक्ष संतोष चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उल्हास बांगर यांनी मुरबाडसाठी आमदार कथोरे साहेबांनी नविन बसेस उपलब्ध करुन दिल्या बद्दल समस्त मुरबाडकरांच्या वतिने आभार व्यक्त केले तर मुरबाड आगाराच्या वतीने रमेश गंभीर राव यांनी उपस्थितांचे स्वागत करुन आभार मानले तर मुरबाड मधील जनतेला चांगली सेवा देण्या बरोबर मुरबाड कल्याण फेर्या सह ग्रामिण भागातील फेर्या वाढविणार असल्याचे आश्वासन आगार प्रमुख योगेश मुसळे यांनी दिले आहे.

या लोकार्पणासाठी उल्हास बांगर, संतोष चौधरी, दिपक पवार, मोहन सासे, जितेंद्र भावार्थे, मुकेश विशे,संजय पवार,संतोष पवार,केशव देसले,जयवंत कराळे,सचिन चौधरी, जगन माळी, मानसी देसले, रेश्मा घरत, ज्योती गोडांबे, मोहन गडगे,सागर चंबावणे, अतुल देशमुख, वसंत जाधव, मनोज देसले, प्रदीप चौधरी,जगदिश पष्टे,कचरू टेकडे यांच्यासह मोठ्या संख्येने भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.



# पेहलगाम भ्याड अतिरेकी हल्ला हा देशासह डोंबिवलीसाठी काळा दिवस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** काल काश्मीरच्या पेहलगाम येथील बैसरन व्हॅली येथील दुर्दैवी आणि भ्याड अतिरेकी हल्ल्यात आपल्या डोंबिवली पश्चिमेतील तीन मराठी युवक मारले गेले त्यातील संजय लक्ष्मण लेले वय ५२ वर्षे राहणार विजयश्री अपार्टमेंट,सुभाष रोड, नवापाडा चौक हे आपले शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेश कदम ह्यांचे सख्खे मेहुणे आहेत व त्यांच्या सोबत इतर जे दोघे डोंबिबलीकर युवक होते ते संजय लेले ह्यांच्या पत्नी सौ कविता ह्यांचे मावस व आत्ये भाऊ होते , एक हेमंत जोशी राहणार सावित्री बिल्डिंग, भागशाला मैदान व अतुल मोने राहणार श्रीराम अंचल, सम्राट चौक हे तिघे एकत्र आपल्या कुटुंबीयांसोबत काश्मीर पर्यटनासाठी गेले होते, संजय लेले ह्यांचे पुत्र हर्षल लेले वय वर्षे




२० ह्यांना अतिरिक्यांची गोळी हाताच्या बोटाला लागून किरकोळ जखमी झाले असून संजय ह्यांची पत्नी सौ.कविता, अतुल वयह् ४४ वर्षे यांची पत्नी सौ अनुष्का व १६ वर्षाची मुलगी रुचा व हेमंत जोशी वय वर्षे ४३ ह्यांची पत्नी सौ मोनिका व १५ वर्षांचा मुलगा ध्रुव असे ६ जन सुखरुप आहेत, परंतु दुर्दैवाने एकाच कुटुंबातील ३ डोंबिवलीकर मात्र ह्या भ्याड हल्ल्यात शहिद झाले, ह्या परिस्थितीत कुमार हर्षल लेले ह्या २० वर्ष्याच्या युवकाने सर्व गांभिर्य लक्षात येताच आपले दुःख गिळून ह्या तीनही कुटुंबीयांना संभाळून अगदी धीराने आलेल्या संकटाचा सामना करत आहे, त्याच्या समोर त्याचे वडील व २ मामा ह्यांना निर्दयी अतिरेक्यांनी गोळ्या घातल्या, हॉस्पिटल, पोलीस यंत्रणा,शवागृह, पोस्ट मार्टम ह्या सगळ्या बाबी धीरोधात्त पणे सामोरे जाऊन तो व त्यांचे आई,मावशी व भावंडे

अशी कुटुंबीय काश्मीर मध्ये अनोळखी ठिकाणी संकटाशी सामना करत आहे, भारत सरकार, भारतीय सैन्यदल, स्थानिक प्रशासकीय अधिकारी, नागरिक ह्यांची मदत होत आहे त्याच बरोबर ह्या यंत्तनेच्या संपर्कात राहून ह्या कुटुंबीयांना खासदार डॉ श्रीकांत शिंदे ह्यांनी काल पासूनच त्वरित मदत करून त्यांचे दिल्लीला गेलेले स्वीय सहाय्यक अभिजित दरेकर ह्यांना श्रीनगरला रवाना केले असून सर्वोतोपरी मदत करण्यास सांगितले आहे, राजेश कदम ह्यांचे सह इतर लेले व मोने कुटुंबीय सुधा आज पहाटे श्रीनगरला रवाना झाले असून त्यांच्या सोबत डॉ श्रीकांत शिंदे ह्यांची एक टीम तेथील पुढील मदतीसाठी पाठविली आहे व खासदार स्वतःलक्ष देऊन आहेत, आमदार रवींद्र चव्हाण,आमदार राजेश मोरे आणि ठाणे जिल्हा अधिकारी श्री शिनगारे, कल्याण प्रांत श्री गोसावी,डीसीपी अतुल झेंडे, कल्याण तहसीलदार, हे देखील ह्या दुर्दैवी कुटुंबीयांच्या मदतीसाठी सतत संपर्कात आहेत...परंतु ह्या लोकशाही देश्यावर व देश्याच्या निष्पाप पर्यटक नागरिकांवर केलेल्या भ्याड अतिरेकी हल्याची मात्र आपले तीन निष्पाप, साधे, सामान्य कुटुंबीयातील डोंबिवलीकर उमदे तरुण गमावून बसलो व त्यांचे कुटुंबीय पोरके झाल्यामुळे आपल्या डोंबिवलीला सुधा भयंकर झळ बसली आहे हा काळा दिवस डोंबिवलीकर कायम लक्ष्यात ठेवणार...ह्या तीनही तरुणांच्या कुटुंबीयांवर कोसळलेले दुःखाचे आभाळ पेलण्याची ताकत्त मिळो हिच ईश्वर चरणी प्रार्थना.

## कल्याणमध्ये १६० वर्षांपासून
# सार्वजनिक वाचनालय जपतंय वाचन संस्कृती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** २३ एप्रिल जागतिक पुस्तक दिनानिमित्त सार्वजनिक वाचनालय कल्याण येथे पुस्तकांची सुंदर कलाकृती उभारण्यात आली असून कल्याणमध्ये १६० वर्षांपासून सार्वजनिक वाचनालय वाचन संस्कृती जपत आहे.१८५७ चे स्वातंत्र्य समर संपून अवघी ७ वर्षे झाली होती आणि त्याच काळी कल्याणमध्ये साहित्य चळवळीला सार्वजनिक वाचनालय कल्याणच्या रुपाने सुरुवात झाली. या वाचनालयाची स्थापना ही १८६४ साली रावबहादुर सदाशिव साठे यांनी केली. सध्या ६ हजार ५०० वाचक संख्या असलेल्या या वाचनालयात १ लाख ५० हजार ग्रंथ आहेत. इतिहासविषयक १ हजार ६०० पुस्तके तर राजकीय विषयक ३ हजार पुस्तके या वाचनालयात आहेत. १६ कर्मचारी १२ तास हे वाचनालय चालवतात. शासनाच्या 'अ' दर्जा प्राप्त वाचनालयांमध्ये सार्वजनिक वाचनालय कल्याण मोडते. कल्याणचा सांस्कृतिक इतिहास, किल्ले दुर्गाडी, सुभे कल्याण ही तीन कल्याणच्या इतिहासावरची जुनी पुस्तके देखील वाचनालयात आहेत. मात्र, सध्या कल्याणकर वाचकांची साहित्याची हौस पुरवणाऱ्या या वाचनालयाला दुर्मिळ ग्रंथ जपण्यासाठी मोठे कष्ट घ्यावे लागत आहेत. वाचनालयातील सहग्रंथपाल







करूणा कल्याणकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, "आमच्या वाचनालयात ६७७ जुने दुर्मिळ ग्रंथ आहेत. हे ग्रंथ टिकवण्यासाठी आमची कर्मचारी त्यातील ग्रंथ मोबाईलवर स्कॅन करते. असे काही ग्रंथ आम्ही मोबाईलवर स्कॅनही केले आहेत. या ग्रंथांचे अत्याधुनिकरित्या स्कॅनिंग करणे आवश्यक आहे."

**दुर्मिळ साहित्य**
**महाराष्ट्र काव्यग्रंथ**
सीतास्वयंवर – १८२६
संस्कृतकाव्यानी – सुजाता जोग – १८३२
जिओग्राफी अँड अस्ट्रॉनॉमी – १८३२
वृक्षवर्णन – १८५७
महाभारत - १८६६
व्यवहारदर्पण – १८७३

दरम्यान, सार्वजनिक वाचनालय कल्याणमध्ये अत्यंत जुने ग्रंथ असून ते जपण्याचे मोठे काम या ग्रंथालयाकडून होत आहे. यासाठी ग्रंथालय प्रशासनाचे साहित्यप्रेमी वाचकांकडून कौतुकही होत आहे. मात्र, त्यांच्या या प्रयत्नांना मोठ्या

**२३ एप्रिल जागतिक पुस्तक दिनानिमित्त सार्वजनिक वाचनालय कल्याण येथे उभारण्यात आली पुस्तकांची सुंदर कलाकृती**

मदतीची गरज साहित्य वर्तुळातून व्यक्त केली जात आहे.

एरव्ही कल्याणमध्ये हजारो रुपयांची बॅनरबाजी करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांचे या वाचनालयाकडे सपशेल दुर्लक्ष झाल्याचे जुन्या कल्याणकरांचे म्हणणे आहे. २००४ साली माजी महापौर हरिश्चंद्र पाटील यांनी व २०१४ साली माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी या वाचनालयाला मदत केली होती. त्यानंतर आजतागायत पुढारी या जुन्या साहित्यरुपी वटवृक्षाकडे फिरकले देखील नसल्याची खंत सामान्य वाचक व्यक्त करत आहेत.

आजच्या जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून या सार्वजनिक वाचनालय कल्याणमध्ये 'पुस्तक, चहा आणि बरंच काही...' हा कार्यक्रम पार पडणार असून प्रा. डॉ. बिपिन वाडेकर वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. आज सायंकाळी ५ वाजता हा कार्यक्रम सार्वजनिक वाचनालय कल्याणच्या सभागृहात पार पडेल.

# ठाणे जिल्ह्याची ग्रामिण गृहनिर्माण मोहिमेत उल्लेखनीय कामगिरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /**ठाणे :** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागांतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनेंतर्गत मुख्यमंत्री यांनी १०० दिवसांचा कृती कार्यक्रम अंतर्गत ठाणे जिल्ह्यात उल्लेखनीय प्रगती करत १०५% उद्दिष्ट पूर्ण केले आहे. ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्याचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३० डिसेंबर, २०२४ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी १०० दिवसांची उद्दिष्टपूर्ती मोहीम जाहीर करण्यात आली होती. या मोहिमेअंतर्गत १३ लाख घरकुलांना मंजुरी, ३ लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित (₹ ४५० कोटी), १ लाख घरकुलांचे भौतिकरूपाने पूर्ण बांधकाम, ५,००० लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देणे उद्दिष्टे दिली गेली होती. या पार्श्वभूमीवर, ठाणे जिल्ह्याने अत्यंत सराहनीय कामगिरी करत निर्धारित १६७१ घरकुलांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत १७५७ घरकुले पूर्ण केली, जी १०५% कामगिरी आहे. या यशामध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, गटविकास अधिकारी पंचायत समिती शहापूर नम्रता जगताप, गटविकास अधिकारी पंचायत समिती मुरबाड लता गायकवाड, गटविकास अधिकारी पंचायत समिती कल्याण संजय भोये, गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबरनाथ पंडित राठोड, गटविकास अधिकारी पंचायत समिती भिवंडी गोविंद खामकर , तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी घेतलेल्या परिश्रमांचे फलित स्पष्टपणे दिसून येते. हा उपक्रम प्रशंसनीय आणि प्रेरणादायी असून, अनेक गरजू कुटुंबांना हक्काचे निवासस्थान मिळाले आहे, ज्यामुळे त्यांचे जीवन अधिक सुरक्षित आणि स्थिर झाले आहे.

# खासदार सुरेश म्हात्रे यांनी घेतली केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांची भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी मंगळवारी कल्याण डोंबिवली मनपा नवनियुक्त आयुक्त अभिनव गोयल यांची मंगळवारी भेट घेतली.भेटीनंतर प्रसिद्धी माध्यामांना सामोरे जाताना त्यांनी सांगितले कि, कल्याण-ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो रेल्वे मार्गाचे काम ठाणे ते धामणकर नाक्यापर्यंत झालेले आहे. मात्र धामणकर नाका ते दुर्गाडी या दरम्यान मेट्रोच्या कामात अनेक अडचणी आहेत. धामणकर नाका ते दुर्गाडी मेट्रो रेल्वेचा मार्ग हा भुयारी असेल अशी माहिती खासदार सुरेश म्हात्रे यांनी दिली आहे. यावेळी महाविकास आघाडीतील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार म्हात्रे यांनी सांगितले की, ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो रेल्वेचे काम ठाणे ते धामणकर नाका दरम्यान मार्गी लागले आहे. धामणकर नाका ते दुर्गाडी या दरम्यान भूयारी मार्ग केला जाणार आहे. त्याचबरोबर कल्याण तळोजा मेट्रोचे काम सुरु आहे. त्यात काही अडचणी आहेत. त्याचाही पाहणी केली जाणार आहे. आयुक्तांसोबत यापूर्वीही कल्याण पश्चिमेतील विविध प्रश्न आणि समस्यावर तोडगा काढण्याकरीता बैठक घेतली होती. त्यापैकी काही प्रश्न सुटले. काही सुटणे बाकी आहे. आत्ता नवे आयुक्त गोयल यांच्यासोबत रस्ते, पाणी प्रश्न, घनकचरा व्यवस्थापन, वाहतूक कोंडी, स्टेशन परिसरातील फेरीवाले, उल्हास नदीत होत असलेल प्रदूषण या विविध विषयावर चर्चा करण्यात आली. या विविध प्रश्न सोडविण्यासाठी आयुक्तांनी साकारात्मकता दर्शविली आहे. या प्रश्नावर चर्चा झाल्याने दर महिन्याला आयुक्तांसोबत आढावा बैठक घेतली जाईल. आयुक्तांसोबत बैठक पार पडल्यावर खासदार म्हात्रे यांनी कल्याण स्टेशन परिसरातील स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या सॅटिस् कामाची पाहणी केली. तसेच स्टेशन परिसरातील फेरीवाल्यांचा वाहतूकीस कसा अडथळा होतो याचा प्रत्यक्ष पाहणी करुन फेरीवाल्यांच्या विरोधात कारवाई करण्याच्या सूचना महापालिकेच्या अधिकार्यांना दिल्या असून स्टेशन परिसरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक विभाग, आणि केडीएमसी यांच्यात बैठक घेण्यात उपाययोजना करीत प्रश्न मार्गी लावणार असल्याचे सांगितले.






'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Registration No. THC/256/2022-2024